आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in   बुधवार दिनांक 07/10/2026   METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन  > पिंपरी चिंचवड व पुणे  > पान 4  > अंक 212  > RNI - MAHMAR /2021/51259  > metrocity924@gmail.com

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

# महापालिकेची धडक मोहीम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत बांधकामांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून, 'ड' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पिंपळे गुरव, प्रभाग क्रमांक 29 येथे अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली. प्रभात नगर येथील सुमारे 432 चौ.मी. क्षेत्रफळाच्या आर.सी.सी. अनधिकृत बांधकामावर महापालिकेच्या पथकाने कारवाई केली.**



महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत महानगरपालिका धडक कारवाई पथकाने ही कारवाई केली. या कारवाईमध्ये बीट निरीक्षक विकास वारभुवन, सचिन फडतरे, रुपक शिनगारे आणि शिवानी भगत यांच्यासह 5 मजूर, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे 15 जवान आणि 3 पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

कारवाईसाठी 1 जॉ क्रशर, 2 जेसीबी आणि 1 ट्रॅक्टर ब्रेकर या यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. आवश्यक पोलीस बंदोबस्त आणि सुरक्षा व्यवस्थेत ही कारवाई करण्यात आली

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत नियमांचे उल्लंघन करून करण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेच्या आवश्यक परवानग्या घेऊनच बांधकाम करावे. तसेच नियमांचे पालन करून शहराच्या नियोजनबद्ध विकासात सहकार्य करावे.

**डॉ. विजय सूर्यवंशी,**
आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## ओला-सुका कचरा वर्गीकरणावर भर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : शहरातील घनकचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दररोज 100 किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या बल्क वेस्ट जनरेटर्सच्या (BWG) सर्वेक्षण व नोंदणी मोहिमेला वेग दिला आहे. गृहसंकुले, हॉटेल, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, कार्यालये, व्यावसायिक आस्थापना, बाजारपेठा आणि मंडई परिसरात महापालिका कर्मचाऱ्यांकडून जनजागृती केली जात आहे.**




घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होणाऱ्या आस्थापनांची माहिती संकलित केली जात आहे. या मोहिमेंतर्गत महापालिकेचे कर्मचारी संबंधित आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देत असून, घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमांची माहिती देण्याबरोबरच नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करत आहेत.शहरातील मोठ्या गृहसंकुलांपासून हॉटेल, रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, कार्यालये, व्यापारी संकुले तसेच अन्य व्यावसायिक आस्थापनांचा या मोहिमेत समावेश करण्यात आला आहे. दररोज 100 किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित आस्थापनांनी swm.cpcb.gov.in/register या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेने कचऱ्याचे ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा अशा चार प्रकारांत योग्य वर्गीकरण करण्यावर भर दिला आहे. विशेषतः ओल्या कचऱ्यावर संबंधित परिसरातच प्रक्रिया करून त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कचऱ्याचे उगमस्थळीच योग्य वर्गीकरण झाल्यास कचरा संकलन, वाहतूक आणि प्रक्रिया व्यवस्थापन अधिक परिणामकारक होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर कचऱ्यामुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण कमी करण्यासही हातभार लागणार आहे.

# आंबेडकरी विचार संपवण्याचा भाजपचा डाव – डॉ. विश्वजीत कदम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : भारतीय जनता पक्ष फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारधारेचा प्रभाव संपवून मनुस्मृती वादी विचार पुढे आणण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोप काँग्रेसचे आमदार डॉ. विश्वजीत कदम यांनी केला. संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून, संविधानाऐवजी मनुस्मृतीचे विचार आणण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याची टीकाही त्यांनी केली.**




पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती पूर्व विभागाच्या अध्यक्षपदी कुणाल राजगुरू यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या पदग्रहण सोहळ्यात डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर, माजी नगरसेविका लता राजगुरू, शहराध्यक्ष प्रशांत जगताप, प्रदेश सरचिटणीस अमीर शेख, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, “पक्षाने कुणाल राजगुरू यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवून त्यांच्यावर विश्वास दाखविला आहे. त्यांच्या सारख्या तरुणांमुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य आणि नवी ऊर्जा निर्माण होत आहे. तरुणांचा राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाला पाठिंबा वाढत आहे. कुणाल राजगुरू अनुसूचित जाती विभागाची मजबूत टीम उभी करून काँग्रेसचा विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवतील, असा विश्वास आहे.”

“फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांच्या मार्गावर काँग्रेसची वाटचाल सुरू आहे. काँग्रेसचा विचार हा पक्षाच्या डीएनएमध्ये आहे. मात्र, भाजपला ही विचारधारा सहन होत नसून विविध मार्गांनी मनुस्मृतीवादी विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. काँग्रेस हा प्रयत्न कधीही यशस्वी होऊ देणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार काँग्रेस पुढे घेऊन जात असून तो अधिक मजबूत करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे कुणाल राजगुरू यांच्यासारख्या लढवय्या तरुणांची पक्षाला गरज आहे,” असेही कदम यांनी सांगितले.

# पुणे बिझनेस स्कूलमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : कॉर्पोरेट क्षेत्रात सक्षम नेतृत्व घडविण्यासाठी पुणे बिझनेस स्कूलचा दोन वर्षांचा व्यवस्थापन अभ्यासक्रम मार्गदर्शक आहे. याठिकाणी उच्च शिक्षणाबरोबरच नेतृत्व आणि व्यावसायिक सक्षमता, नाविन्य, बदलत्या व्यावसायिक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होईल, त्याचा पीबीएस च्या विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले करिअर घडवावे आणि देशाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान द्यावे असे मार्गदर्शन पीबीएसचे संचालक व प्राचार्य डॉ. गणेश राव यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पुणे बिझनेस स्कूल मध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी पीबीएसच्या डीन डॉ. मीनाक्षी त्यागी, मास्टर कार्डचे मध्यपूर्व आफ्रिका आणि युरोप संचालक हेमंत शर्मा, इंडिया डिजिटल ॲग्रीकल्चर कौन्सिलचे अध्यक्ष दुष्यंत त्यागी, संचेती हेल्थकेअर ॲकॅडमीचे मानव संसाधन प्रमुख अजंता डे, बायर ग्लोबल प्रोक्युरमेंट व्यवस्थापक सीमा मोहंती, केपीआयटी संचालक मृणाल मजुमदार, नाऊ यू सीड इंडिया प्रा. लि. विपणन उपाध्यक्ष संदीप कुलकर्णी, व्हर्लपूल इंडिया उपव्यवस्थापक दिनेश शिंदे, टाटा मोटर्स डीजीएम प्रमुख अर्चना सराफ, झायडस बायोलॉजिक्स शिक्षण आणि विकास प्रमुख विवेक शर्मा, फर्टिओनिक्स सोल्युशन्स एलएलपी संचालक जितेंद्र कोळपे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. मीनाक्षी त्यागी यांनी सांगितले की, पीबीएस मधील प्रवेश म्हणजे उद्योगांसाठी व्यवस्थापकीय क्षमता, नैतिक मूल्ये आणि समाजावर सकारात्मक प्रभाव पाडण्याची वचनबद्धता आणि आत्मविश्वास असणारे सक्षम नेतृत्व घडवणे होय. येथे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, मार्गदर्शन, औद्योगिक भेटी यांच्या माध्यमातून नावीन्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेवर भर असलेल्या एका नवीन शैक्षणिक मार्गाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगताच्या अपेक्षा समजून घेण्याची आणि नेतृत्व, करिअर विकास व बदलत्या व्यावसायिक वातावरणाबद्दल अधिक माहिती दिली जाते असे डॉ. त्यागी यांनी सांगितले.

यावेळी कॉर्पोरेट प्रतिनिधींनी नेतृत्वाची जबाबदारी आणि विविध क्षेत्रांतील उदयोन्मुख संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 07/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भरधाव कारची धडक; वृद्ध महिला गंभीर जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या कारने धडक दिल्याने एका 23 वर्षीय महिलेच्या आजीला गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी कारचालकाविरोधात शिरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीवर, ही घटना 4 ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे 1.30 वाजता मावळ तालुक्यातील जुना उर्से टोलनाका परिसरात घडली.या प्रकरणात 23 वर्षीय महिला फिर्यादी, व्यवसाय-शिक्षण, रा. नागठाणे, ता. पोलिस जि. सांगली, यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी प्रथम शशिकांत भोर (वय 22, रा. मुंबई) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादीनुसार, महिला आपल्या आजोबा व आजीसोबत पुण्याहून मुंबईकडे जात होती. जुना उर्से टोलनाका येथे रस्ता ओलांडत असताना मुंबईच्या दिशेने जाणारी एक पांढऱ्या रंगाची मारुती कंपनीची कार आली. आरोपीने हयगय व अविचाराने भरधाव वेगात वाहन चालवून फिर्यादीच्या आजी मंगल ईश्वर पाटील यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांना साधी व गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या दुखापतीस कारणीभूत ठरल्याचा आरोप कारचालकावर आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मंत्रिमंडळात मोठा निर्णय !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पोलीस कोठडीतील व्यक्तींच्या मृत्यू प्रकरणात त्यांच्या जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतच्या धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

या धोरणानुसार पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मारहाण, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास जवळच्या वारसदारास 5 लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. अशा व्यक्तीस शारीरिक किंवा मानसिक छळामुळे पन्नास टक्क्यांहून कमी कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास दोन लाख आणि त्याहून अधिक प्रमाणात अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास चार लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.वयोमानानुसार, किंवा कोठडीत येण्यापूर्वीच्या जुन्या असाध्य आजाराने नैसर्गिकरित्या मृत्यू झाल्यास, अचानक उद्‌भवलेली नैसर्गिक आपत्ती, स्वतःहून वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्यास, कोठडीतून पलायन करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास, अवाजवी मागणीसाठी उपोषण किंवा वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याने झालेला मृत्यू या परिस्थितीत ही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.निष्काळजीपणा करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक वेतनातून, निवृत्तीवेतनातून किंवा मालमत्तेतून नुकसानभरपाई रक्कम वसूल करण्याची तरतूदही धोरणात समाविष्ट करण्यात आली आहे.



# तरुणाला बेदम मारहाण!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेलेल्या तरुणाचा धक्का लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रुपांतर मारहाणीत झाले. चार अनोळखी व्यक्तींनी तरुणाला शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर एका आरोपीने डोक्यात बीअरची बाटली फोडल्याचा आरोप आहे.**




या प्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटना 3 ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे 10.45 वाजता हॉटेल सरपंच मळा, शेलारवस्ती, चिखली येथे घडली. गुन्हा 4 ऑक्टोबर रोजी रात्री 11.35 वाजता दाखल करण्यात आला.

आदित्य भगवान कळमकर (वय 28, व्यवसाय-व्यवसाय, रा. चिखली गावठाण, टाळ मंदिराजवळ, चिखली) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आपल्या मित्र निलेश कांबळे याच्यासोबत जेवण करण्यासाठी शेलारवस्ती येथील हॉटेलमध्ये गेले होते. त्यावेळी आरोपी याचा फिर्यादीला धक्का लागला. त्यावरून त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली.यानंतर चार अनोळखी व्यक्तींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. तसेच हाताने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादी हॉटेलच्या बाहेर गेल्यानंतरही आरोपींनी त्यांचा पाठलाग करून पुन्हा मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.यावेळी आरोपी याने फिर्यादीच्या डोक्यात बीअरची बाटली फोडली. इतर आरोपींनी अंगावर दगड फेकून मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला, डाव्या खांद्याला, डाव्या पायाला आणि तोंडाला दुखापत झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या प्रकरणी चार अनोळखी आरोपींविरोधात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 07/10/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# संधी मिळाली की प्रतिभेचा जल्लोष : गोयल

## विद्यापीठाच्या 'जल्लोष 2026' स्पर्धेत 1200 विद्यार्थ्यांचा सहभाग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : 'विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाले, तर त्यांच्या प्रतिभेला नवी दिशा मिळते. त्यांच्या प्रतिभेचा खऱ्या अर्थाने जल्लोष होतो,' असे प्रतिपादन खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी केले.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित 'जल्लोष 2026' या उपक्रमाच्या पिंपरी-चिंचवड विभागीय स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी ते बोलत होते. खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील सुमारे 1200 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. संगीता जगताप, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. गणेश भामे, विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालिका डॉ. सविता कुलकर्णी, खडकी शिक्षण संस्थेचे सचिव आनंद छाजेड, सदस्य ॲड. अजय सूर्यवंशी, रमेश अवस्थी, विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, स्पर्धक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.गोयल म्हणाले, 'महाविद्यालयीन जीवनातच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना खऱ्या अर्थाने वाव मिळतो. त्यात 'जल्लोष'सारख्या स्पर्धा त्यांच्यातील ऊर्जा अधिक चैतन्यदायी करण्याचे काम करतात. यातील सर्वच विद्यार्थ्यांना भविष्यात याच क्षेत्रात संधी मिळेल असे नाही. मात्र, यामुळे जगासोबत कसे वागायचे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल, याची खात्री आहे.'टी. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक प्रा. स्वामीराज भिसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# स्पाइन रोडवरील अनधिकृत पार्किंगविरोधात पोलिस ॲक्शन मोडवर

## तुषार सहाणेंच्या निवेदनानंतर तातडीच्या कारवाईचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : स्पाइन रोड आणि मोशी परिसरातील वाढत्या अनधिकृत पार्किंग, अवजड कंटेनर्स आणि वाहतूक कोंडीच्या समस्येची अखेर पोलिस प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. प्रभाग क्रमांक 8 चे नगरसेवक तथा विधी समिती सदस्य तुषार भिवाजी सहाणे यांनी वाहतूक पोलीस उपआयुक्त विक्रांत देशमुख आणि तळवडे वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामचंद्र घाडगे यांची भेट घेऊन याबाबत सविस्तर निवेदन दिले.**




जय गणेश साम्राज्य चौक ते संत नगर चौक, स्पाइन मॉल चौक ते सेक्टर 13 ब्रीज या मार्गावरील सर्व्हिस रोडवर दोन्ही बाजूंना अस्ताव्यस्त वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळी वाहतूक कोंडी वाढत असून, अपघातांचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, सेक्टर 9, 10, 11 आणि 13 मधील मोकळ्या भूखंडांवर अवजड कंटेनर्स आणि वाहने अनधिकृतपणे उभी केली जात असल्याने स्थानिक नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या वाहनांमुळे रस्ते अरुंद होत असून रुग्णवाहिकांसारख्या अत्यावश्यक सेवांनाही अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

**पोलिस प्रशासनाकडून महत्त्वाचे निर्देश**

तुषार सहाणे यांच्या निवेदनानंतर पोलिस प्रशासनाने या परिसरात तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामध्ये—

'नो पार्किंग' आणि 'सम-विषम पार्किंग'चे फलक लावणे

'No Container Parking'चे फलक बसवणे

नियमबाह्य पार्किंग करणाऱ्या वाहनांवर दंड व टोईंग कारवाई

सकाळी-सायंकाळी वाहतूक पोलिसांची विशेष गस्त

वाहतूक नियंत्रणासाठी वॉर्डनची नियुक्ती

अनधिकृतपणे वाहने व कंटेनर्स उभे करणाऱ्यांवर कठोर कारवाई यांचा समावेश आहे.

"स्पाइन रोड हा अत्यंत महत्त्वाचा आणि रहदारीचा मार्ग आहे. अनधिकृत पार्किंग आणि कंटेनर्समुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. नागरिकांची सुरक्षा आणि वाहतूक कोंडीमुक्त प्रभाग हा आमचा मुख्य उद्देश आहे. पोलिस प्रशासनाने तातडीच्या कारवाईचे निर्देश दिल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळेल," असे नगरसेवक तुषार सहाणे यांनी सांगितले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968